# पोलीस उप –आयुक्त, शहर वाहतुक शाखा, ठाणे शहर

महाराष्ट्र पोलीस

OW/DCP TRAFFIC THN/ADM/ NOTIFACTION/ ४८ /2017
पोलीस उप आयुक्त,शहर वाहतूक शाखा,यांचे कार्यालय,तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक 022- 25401056
दिनांक :– 29092017

संदर्भ :– या कार्यालयाचे जा.क्र.पोउआ/वाहतुक/अधिसुचना/४२/१७ दि. ०८/०९/२१०७ मध्ये पॅरा क्र. ४ मध्ये नमुद केलेल्या बाबींची अंमलबजावणी होणे बाबत.

"वाहतूक नियंत्रण अधिसुचना"

ज्याअर्थी, ठाणे शहरा अंतर्गत परिसरातून राज्यात व बाहेरील राज्यात मुंबई कडून आनंदनगर चेक नाक्या वरून पूर्व द्रुतगती महामार्गाने ( रा.म.क्र. ३) तसेच जे.एन.पी.टी. /कळंबोली नवी मुंबई कडून पनवेल रोडने शिळफाटा मुंब्रा बायपास मार्गे –रा.म.क्र. ३ भिवंडी बाजूने अथवा घोडबंदर रोडने जड–अवजड वाहनांची मोठया प्रमाणात ये–जा होत असते.

२) ज्याअर्थी, सद्या आनंदनगर चेक नाक्या जवळील कोपरी रेल्वे ओव्हर ब्रिज तसेच मुंब्रा बायपास– रेतिबंदर जवळील पारसिक पुल व कल्याण येथील दुर्गाडी पत्री पुल सततच्या जड–अवजड वाहनाचे वाहतुकीचे दृष्टीने कमकुवत झाले आहेत.

३) ज्याअर्थी, कोपरी रेल्वे ओव्हर ब्रिज, मुंब्रा बायपास रेतिबंदर येथील पारसिक पुल व पत्रीपुल या पुलावरून जड अवजड वाहनांची वाहतुकीच्या पडत असलेला सततचा ताण सुरक्षिततेच्या दृष्टीने काही अंशी कमी व्हावा असे वाटते. यास्तव वरिल संदर्भान्वये वाहतुक अधिसुचना निर्गमित करण्यात आली आहे.

४) ज्याअर्थी, मा. उच्च न्यायालयाच्या, मुंबई शहरात मोटार वाहनाच्या वायुप्रदुषणा बाबत सी.एन.जी./एल.पी.जी. वर चालणाऱ्या वाहना खेरीज ८ वर्ष वयावरील कोणतेही परिवहन वाहनास प्रवेश बंद केले आहेत. त्या संदर्भातील तदअनुषंगीक वेळोवळी निर्गमित आदेश/सुचनाचे अधिन राहून त्यांची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे.

५) त्याअर्थी मी, अमित का. काळे, मला ठाणे शहर वाहतुक शाखेचे पोलीस उप आयुक्त म्हणून महाराष्ट्र शासन गृहविभाग एम.व्ही.ए. –११६/सी.आर/३७/टी.आर. दि.०७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (अ) (ब) अन्वये मला प्राप्त अधिकारानुसार सुधारीत वाहतूक नियंत्रण अधिसुचना जारी करतो की:–

अ) सदरची अधिसुचना **सम** ( २,४,६,८,१०,१२.....) तारखेस अवजड ( मल्टीएक्सल ) वाहनांना सकाळी ११.०० ते १७०० व रात्रौ २३.०० ते पहाटे ०५.०० वा. दरम्यान जे.एन.पी.टी. कडून मुंब्रा बायपास शिळफाटयाकडे येण्यास (म्हापे रोडने) **प्रवेश बंद** करण्यात येत असून , सदरची वाहने कोपरखैरणे –बेलापुर रोडने –ऐरोली–आनंदनगर चेक नाका –पूर्व द्रुतगती मार्गाने इच्छित स्थळी जातील.

ब) तसेच **विषम** ( १,३,५,७,९,११,१३.....) तारखेस–जे.एन.पी.टी. कडे जाणाऱ्या अवजड (मल्टीएक्सल) वाहनांना सकाळी ११.०० ते १७०० व रात्रौ २३.०० ते पहाटे ०५.०० वा. दरम्यान रा.म.क्र. ३ खारेगांव टोल नाका –गॅमन सर्कल –मुंब्रा बायपास मार्गे जाण्यास **प्रवेश बंद** करण्यात येत आहे. सदरची वाहने सरळ गोल्डनडाईज मार्ग–पूर्व द्रुतगती मार्गाने आनंदनगर चेक नाका –पुढे ऐरोली ब्रिज–ऐरोली –बेलापूर रोडने जे.एन.पी.टी.कडे जातील.

सदरची वाहतुक अधिसचुना ही प्रसिध्द झाले पासून मुंब्रा बायपास रेतिबंदर येथील पारसिक पुलाची दुरूस्तीचे काम पुर्ण होई पावेतो अमलात राहिल.

( अमित का.काळे )
पोलीस उप आयुक्त,शहर वाहतुक शाखा
ठाणे शहर

प्रति,

जिल्हा प्रसिध्दी अधिकारी, ठाणे

२/– सदरची अधिसुचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.